**महाराष्ट्र शासन**

क्रमांक-प्रआयो-२०२५/प्र.क्र.११/योजना-१०
ग्राम विकास व पंचायतराज विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबन रोड,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दिनांक:- ०७ मार्च, २०२५.

प्रति,

कार्यकारी अध्यक्ष,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद (सर्व).

**विषय :- प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत पात्र कुटुंबाचे सर्वेक्षण करणेबाबत.**

**संदर्भ:-** १) उप महानिदेशक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र.No.J-११०१४/१/२०२४-RH-Pol.(e-३८७५७९), दि. १४ ऑगस्ट, २०२४ रोजीचे पत्र.

२) संचालक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र.No.M- १२०१८-RH-(M&T)Part(१), दि. २२ ऑगस्ट, २०२४ रोजीचे पत्र

३) संचालक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे कडील पत्र क्र.No.M-१२०१८/०२/२०१९-RH (M&T) (e-३६८१४६), दि.२७/१२/२०२४.

केंद्रीय मंत्रीमंडळाने दि. ९ ऑगस्ट, २०२४ रोजी झालेल्या बैठकीत २ कोटी घरकुले बांधण्यासाठी पुढील ५ वर्ष सन २०२४-२५ ते २०२८-२९ या कालावधीत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ सुरु करण्याची घोषणा केली आहे. त्यानुषंगाने, संदर्भ क्र.१ अन्वये, सन २०१८ मध्ये झालेल्या आवास प्लस सर्वेक्षणामध्ये तयार करण्यात आलेल्या प्रतिक्षा यादी (Priority List) मध्ये समाविष्ट न झालेले व सिस्टीमद्वारे अपात्र झालेले परंतु सद्यस्थितीत पात्र असलेले कुटुंबाचे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत खालील नवीन Exclusion Criteria नुसार सर्वेक्षण करण्याच्या सूचना ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी दिल्या आहेत.

**सुधारीत Exclusion Criteria पुढील प्रमाणे आहेत.**

१) तीन/ चार चाकी वाहन असणारे कुटूंबे.
२) तीन/ चार चाकी कृषी उपकरण असणारे कुटूंबे.
३) रु. ५०,००० किसान क्रेडिट कार्ड किंवा त्याहुन अधिक क्रेडिट मर्यादा असलेले कुटूंबे.
४) कुटुंबातील कोणताही सदस्य सरकारी कर्मचारी असलेले कुटूंबे.
५) शासनाकडे नोंदणीकृत बिगर कृषी उद्योग असलेली कुटुंबे.
६) कुटुंबातील कोणताही सदस्य दरमहा रु.१५,००० पेक्षा जास्त कमवत असलेले कुटूंबे.

७) आयकर भरणारे कुटुंबे.
८) व्यवसायीक कर भरणारे कुटुंबे.
९) २.५ एकर किंवा त्याहून अधिक बागायती जमीन असणारे कुटूंबे.
१०) ५ एकर पेक्षा जास्त परंतु जिरायती जमीन असणारे कुटूंबे.

त्यानुसार, प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत पात्र कुटुंबाचे सुधारीत Exclusion Criteria नुसार सर्वेक्षण करण्यासाठी संदर्भ क्र. २ अन्वये, सुधारीत Awaas+ मोबाईल ॲपमध्ये सर्वेक्षकाची नोंदणी करणेबाबत ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी कळविले होते. त्यानुसार राज्यामध्ये Awaas+ २०२४ मोबाईल ॲपमध्ये सर्वेक्षण करण्यासाठी सर्व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची (ग्रामसेवक / ग्राम विकास अधिकारी ) सर्वेक्षक (Surveyor) म्हणून ग्रामपंचायत निहाय नोंदणी पूर्ण करण्यात आली आहे. संदर्भ क्र.३ अन्वये, प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत सुधारीत आवास प्लस २०२४ मोबाईल ॲपद्वारे सर्वेक्षण करण्यासाठी ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेमार्फत आदर्श कार्यपध्दती (SOP) प्राप्त झाली असून,त्यामध्ये पुढील प्रमाणे Modules दिले आहेत.

१) SOP for Self –Survey using Awaas + 2024 application
२) SOP for Assisted–Survey using Awaas + 2024 application
३) Accountability of official involved in survey process.

याबाबत सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी जसे- प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, गट विकास अधिकारी , पंचायत समिती व ग्रामपंचायत अधिकारी यांचे ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार ऑनलाइन पद्धतीने वेबीनारद्वारे दोनवेळा orientation करण्यात आले आहे.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा २ अंतर्गत सर्वेक्षणाची सर्व जिल्ह्यामध्ये सर्व सामान्य जनतेला त्याची माहिती करुन द्यावी व प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा २ अंतर्गत पात्र कुटुंबाचे (Potentially eligible households under PMAY-G) सर्वेक्षण करण्याची कार्यवाही विहीत वेळेत पूर्ण करावी अशा सूचना ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी दिल्या आहेत.

**या सर्वेक्षणाकरिता खालीलप्रमाणे मनुष्यबळ-**

| **अ.क्र.** | पद | पद | **कामाचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| १ | सर्वेक्षक (Surveyor) | ग्रामपंचायत अधिकारी | आवास प्लस सर्वेक्षणामध्ये तयार करण्यात आलेल्या प्रतिक्षा यादी (Priority List) मध्ये समाविष्ट न झालेले व सिस्टीमद्वारे अपात्र झालेले परंतु सद्यस्थितीत पात्र असलेले कुटुंबाचे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत सुधारित Exclusion Criteria नुसार सर्वेक्षण करणे. |

या सर्वेक्षणाचे नियोजन व सनियंत्रण करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करावी.

१. जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (अध्यक्ष).
२. जिल्ह्यातील सर्व गट विकास अधिकारी (सदस्य).
३. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सदस्य सचिव).

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या जिल्ह्यातील प्रकल्प संचालक, गट विकास अधिकारी व पंचायत समिती कर्मचारी यांनी सर्वेक्षण सर्व ग्रामपंचायती मध्ये होईल याची दक्षता घ्यावी व नोंदणी करण्यात आलेल्या कुटुंबाची Randomly तपासणी करावी . प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा २ अंतर्गत आपल्या जिल्ह्यामध्ये या सर्वेक्षणाची व्यापक प्रसिध्दी करुन, सर्व सामान्य जनतेला त्याची माहिती करुन द्यावी. सर्व ग्रामपंचायतीमध्ये सर्वेक्षण करण्याची कार्यवाही विहीत वेळेत पूर्ण करावी.

**सोबत :- १) संदर्भिय पत्र व कार्यपध्दती .**

**२) सर्वेक्षणासाठी स्वयंघोषणापत्र व पोचपावती नमुना**

**(एकनाथ डवले, भा.प्र.से.)**
प्रधान सचिव,
ग्रामविकास व पंचायत राज विभाग

**प्रत :-**

१. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहितीस्तव.
२. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई यांना पुढील कार्यवाहीस्तव.
३. उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
४. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव.

# पोचपावती

श्री./ श्रीम.................................................... यांचे दि....................... रोजी सर्वेक्षण झालेले असून त्यांची माहिती प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत आवास+ २०२४ ॲपमध्ये Upload करणेत आलेली आहे.

पोहोचपावती देणाऱ्याची सही ................................ पोहोचपावती घेणाऱ्याची सही---------------

पोहोचपावती देणाऱ्याचे नाव ................................. पोहोचपावती घेणाऱ्याचे नाव --------------

(सदर पोहोचपावती पंचायत समिती कार्यालयास जमा करणेत आली.)

# पोचपावती

श्री./ श्रीम.................................................... यांचे दि....................... रोजी सर्वेक्षण झालेले असून त्यांची माहिती प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत आवास+ २०२४ ॲपमध्ये Upload करणेत आलेली आहे.

पोहोचपावती देणाऱ्याची सही ................................ पोहोचपावती घेणाऱ्याची सही ........

पोहोचपावती देणाऱ्याचे नाव ...................................... पोहोचपावती घेणाऱ्याचे नाव ................

(सदर पोहोचपावती इच्छूक लाभधारकास उपलब्ध करुन देणेत आली.)

# कुटूंबप्रमुखाचे स्वयंघोषणा पत्र

मी, श्री./ श्रीम. ........................................ वय, वर्षे ........, मु.पो................, ता..............., जि................. स्वयंघोषीत करीत आहे की, प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत पात्र कुटुंबासाठी घरकुल योजनेंतर्गत लाभार्थ्यांच्या सर्वेक्षणाकरीता मी माहिती दिलेली असून माहिती बरोबर आहे. सदर माहिती कोणत्याही टप्प्यावर चूकीची अथवा खोटी आढळल्यास शासन नियमानुसार मी शिक्षेस पात्र राहीन. तसेच, शासनाच्या घरकुल व अन्य कोणत्याही योजनेचा लाभ मिळणार नाही, याची मला पूर्ण जाणीव आहे.

स्वाक्षरी/ अंगठा.................................

(अंगठा असेल तर प्रमाणित करणेसाठी गावातील सुशिक्षित व्यतीचे नाव व सही.)

कुटूंबप्रमुख/ कुटूंब सदस्याचे नाव .........................................................

# सर्वेक्षक यांचे स्वयंघोषणा पत्र

मी, श्री./ श्रीम. ................................................ सर्वेक्षक स्वयंघोषीत करित आहे की, प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत पात्र कुटूंबासाठी घरकुल योजनेंतर्गत श्री/श्रीम. ............................................ या इच्छूक लाभधारकाचे सर्वेक्षण मी केले आहे. सदर सर्वेक्षणाकरीता इच्छूक लाभधारकाने जी माहिती दिलेली आहे ती त्याच्यासमोर तपासून खात्री करुन आवास+ २०२४ ॲपमध्ये अचूक Upload केलेली आहे. इच्छूक लाभधारकाने सांगितलेल्या माहिती व्यतिरिक्त इतर माहिती Upload करणेत आलेली नाही.

स्वाक्षरी.................................

सर्वेक्षकाचे नाव ........................................